पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १०

**सभावृत्तांत**

दिनांक - **२४/१०/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा वार बुधवार दिनांक – **२४/१०/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.चौगुले सीमा दत्तात्रय - सभापती**
२. मा.भोईर सुरेश शिवाजी
३. मा.घोलप कमल अनिल
४. मा.गायकवाड निर्मला मनोज
५. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
६. मा.सुलक्षणा राजू धर
७. मा.निलेश हिरामण बारणे

या शिवाय मा.इंदलकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कोळंबे – मुख्यलेखापाल, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.मोरे – कार्यकारी अभियंता, मा.आगळे – प्रशासन अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) स्वच्छ भारत अभियान २०१८ अंतर्गत झोपडपट्टयांमधील शौचालयांची दुरुस्ती करणेकामी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत – मा.कमल घोलप, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) यशवंतनगर झोपडपट्टीमध्ये नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सेवा सुविधा पुरविणेकामी प्रशासकीय मान्यता देणेबाबत – मा.निर्मला गायकवाड, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) पिंपळे गुरव मधील राजीव गांधीनगर झोपडपट्टीमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका दलित वस्तीमध्ये स्थापत्य विषयक सेवा सुविधा पुरविणेचे कामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत - मा.वैशाली घोडेकर, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) सी.टी.व्हिजन आराखडयातील दर्शविणेत आलेल्या एका देशास भेट देणेबाबत – मा.निर्मला गायकवाड, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) भूसंपादानाचे विषयावर तातडीने कार्यवाही करणेबाबत – मा.निर्मला गायकवाड, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक २६/०९/२०१८, २९/०९/२०१८, ०९/१०/२०१८ व १२/१०/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.९) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------------

ठराव क्रमांक - २५ विषय क्रमांक - ०१

दिनांक - २४/१०/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक : मा.कमल घोलप

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/०९/२२४/२०१८, दि.१६/१०/२०१८

विषय : मौजे वाकड येथील स.नं.२१०/३ मधील २४ मी.रस्ता रद्द करणेकरिता महाराष्ट्र शासन प्रादेशिक अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबत...

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - २६ विषय क्रमांक - ०२

दिनांक - २४/१०/२०१८

सुचक : मा.कमल घोलप अनुमोदक : मा.सुलक्षणा धर

संदर्भ : मा.कमल घोलप, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव –

स्वच्छ भारत अभियान २०१८ अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ७१ झोपडपट्टयांमधील शौचालयांची दुरुस्ती व डागडूजी करणेच्या र.रु.५०,००,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २४/१०/२०१८

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.सुलक्षणा धर

संदर्भ : मा.निर्मला गायकवाड, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव –

यशवंतराव चव्हाण झोपडपट्टीमध्ये नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सेवा सुविधा पुरविणेचे कामास व त्याचे अंदाजपत्रकीय र.रु.२३,००,०००/- (अक्षरी र.रु.तेवीस लाख फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २८ विषय क्रमांक - ०४

दिनांक - २४/१०/२०१८

सुचक : मा.वैशाली घोडेकर अनुमोदक : मा.सुरेश भोईर

संदर्भ : मा.वैशाली घोडेकर, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव –

पिंपळे गुरव मधील राजीवगांधीनगर झोपडपट्टीमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका दलित वस्तीमध्ये स्थापत्य विषयक सेवा सुविधा पुरविणेचे कामास व त्याचे अंदाजपत्रकीय र.रु. २३,००,०००/- (अक्षरी र.रु.तेवीस लाख फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच मिलिंदनगर समाजमंदिर प्रवेशद्वार व सिमाभिंतीचे बांधकाम करणेचे कामास व व त्याचे अंदाजपत्रकीय र.रु. २०,००,०००/- (अक्षरी र.रु.वीस लाख फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९ विषय क्रमांक - ०५

दिनांक - २४/१०/२०१८

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.सुरेश भोईर

संदर्भ : मा.निर्मला गायकवाड, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव –

सी.टी.व्हिजन आराखडा तयार करताना ज्या उत्तम शहरांचा आधार घेणेत आलेला आहे त्यातील एक शहर मा.आयुक्त सो.यांनी निवडून त्यानुसार आपले शहर सुधारणा करणेसाठी मार्गदर्शन होणेकामी त्या शहरास खाली नमूद प्रमाणे शहर सुधारणा समिती मा.सभापती आणि मा.सदस्य तसेच मनपा अधिकारी यांची त्या शहरास भेट देऊन अभ्यास करणेकामी मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने त्वरित कार्यक्रम ठरविण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता त्यावर त्वरित कार्यवाही करणेत यावी.

१) सौ.सीमा दत्तात्रय चौगुले – सभापती
२) सौ.माया संतोष बारणे – सदस्य
३) श्री.सुरेश शिवाजी भोईर - सदस्य
४) सौ.कमल अनिल घोलप - सदस्य
५) सौ.निर्मला मनोज गायकवाड - सदस्य
६) सौ.वैशाली ज्ञानदेव घोडेकर - सदस्य
७) सौ.उषा संजागे वाघेरे – पाटील - सदस्य
८) सौ.सुलक्षणा राजू धर - सदस्य
९) श्री.निलेश हिरामण बारणे - सदस्य
१०) श्री.निळकंठ पोमण - मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०　　　　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक - ०६

दिनांक - २४/१०/२०१८

सुचक : मा.निर्मला गायकवाड　　　　　　　　　　　　अनुमोदक : मा.वैशाली घोडेकर

संदर्भ : मा.निर्मला गायकवाड, मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव –

भूसंपादनाचे विषय मा.महानगरपालिका सभेच्या मान्यतेनंतर दोन महिन्यांचे आतमध्ये मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणेबाबतची कार्यवाही संबंधित विभागाचे अधिकारी यांनी करणे आवश्यक आहे. यामध्ये विलंब झाल्यास सदर संबधित अधिका-यावर वेतनवाढ स्थगितीची कारवाई करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सीमा दत्तात्रय चौगुले)**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७०१/२०१८
दिनांक : २५/१०/२०१८



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.